# मुख्य महानगर दंडाधिकारी यांचे कार्यालय, एस्प्लनेड, मुंबई.

संदर्भ : माननीय उच्च न्यायालय, मुंबई पत्र क्र.बी (जन)५६०१/५७/२०१८/१३३८
दिनांक ३१.१०.२०१८.

## कार्यालयीन आदेश

(क्र.आस्था१६/ १२ /२०२१ दिनांक ०२.०१.२०२१)

मुख्य महानगर दंडाधिकारी, एस्प्लनेड, मुंबई या कार्यालयाच्या निवड समितीने **'कनिष्ठ लिपिक'** (लिपिक-टंकलेखक) या पदासाठी निवड केलेल्या उमेदवारांच्या यादीला माननीय उच्च न्यायालयाने वरील संदर्भांकित पत्रानुसार मंजूरी दिलेली आहे व सदरची निवड/प्रतिक्षा सूची दिनांक १२.११.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

तरी प्रभारी मुख्य महानगर दंडाधिकारी, एस्प्लनेड, मुंबई हे या कार्यालयातील **'कनिष्ठ लिपिक'** (लिपिक-टंकलेखक) या पदाच्या रिक्त पदांसाठी निवड/प्रतिक्षा यादीतील उमेदवार अनु. क्र. ७५ ते अनु. क्र. ७७ यांच्या नियुक्तीचे आदेश निर्गमित करीत आहेत. उपरोक्त उमेदवाराची **वेतननिश्चिती सातव्या आयोगाच्या शिफारसीनुसार रु. १९,९०० - ६३,२०० (एस-६)** या वेतनश्रेणीमध्ये करण्यात येऊन त्याप्रमाणे त्यांना वेतन अदा करण्यात येईल.

निवड/प्रतिक्षा यादीतील खालील नमुद उमेदवार अनु. क्र. ७५ ते अनु. क्र. ७७ यांनी या कार्यालयात **दिनांक ११.०१.२०२१** (मध्यान्हपूर्व) रोजी हजर रहावे.

| अनु. क्र. | उमेदवाराचे नाव व आसन क्रमांक | निवड/प्रतिक्षा यादी क्रमांक | उमेदवाराचा पत्ता |
|---|---|---|---|
| १ | श्री. विक्रम मारुती पवार (आसन क्र.S-119/C-1559) | ७५ | चाळ नं. ६, रुम नं. १, यशवंत कॉलनी, गणेश मार्ग, हरीयाली गाव, विक्रोळी (पुर्व), मुंबई ४०००८३. |
| २ | श्रीमती. स्वाती विनायक कुंभार (आसन क्र. C-357) | ७६ | ३१५, करंजे पेठ, सातारा जुना पुणे हायवे, महालक्ष्मी मंदिर जवळ, जिल्हा - सातारा, पिन क्र. ४१५००१. |
| ३ | श्री. कुणाल बापुराव पाटील (आसन क्र. C-1070) | ७७ | १४ बी, मु. बाळापूर, पो. फागणे, दत्त मंदिर चौक, जिल्हा - धुळे, पिन क्र. ४२४३०१. |

..०२..

१) उपरोक्त उमेदवारांची नेमणूक ही अस्थायी स्वरुपाची असेल.

२) उपरोक्त उमेदवारांनी कामावर रूजू होतांना मुळ शैक्षणिक व इतर प्रमाणपत्रे तसेच त्यांच्या साक्षांकित प्रती, सदर परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall Ticket) व पॅन कार्ड/आधार कार्ड/ ड्रायव्हिंग लायसन्स (यापैकी एक) सादर करावे.

३) उमेदवारांना कामावर रुजू झाल्यानंतर सदर कार्यालयीन आदेशातील अटी व शर्तीचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र व एकनिष्ठतेचे शपथपत्र द्यावे लागेल.

४) उमेदवारांना वैद्यकीय तपासणीसाठी पाठविण्यात येईल व वैद्यकीयदृष्ट्या पात्र असल्याबाबतचे प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करणे अनिवार्य असेल.

५) उमेदवारांनी एक महिन्याची आगाऊ नोटीस दिल्याशिवाय राजीनामा दिला तर त्यांना एक महिन्याचे वेतन सरकार जमा करावे लागेल.

६) उमेदवारांना या कार्यालयाची निम्नश्रेणी व उच्चश्रेणी विभागीय परीक्षा नियमानुसार उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

७) अ) उपरोक्त उमेदवारांनी महाराष्ट्र नागरी सेवा (इंग्रजी लघुलेखक व इंग्रजी टंकलेखक यांना प्राप्त करावयाच्या मराठी लघुलेखन/मराठी टंकलेखन नियमावलीनुसार परीक्षा सक्तीची करण्याबाबत) नियमावली १९९१ नुसार मराठी टंकलेखनाची एतदर्थ मंडळाची परीक्षा नियमानुसार उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

ब) शासन निर्णय क्रमांकः टंलेप-२०१५/प्र.क्र.१७६/भाषा-२, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई, दिनांक २४ मार्च, २०१७ अन्वये, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दिनांक २४ मार्च, २०१७ च्या अधिसूचनेनुसार, ज्या उमेदवारांनी त्यांच्या मूळ नियुक्तीच्या वेळी यथास्थिती, शासकीय सेवेत रुजू झाल्याच्या दिनांकापासून ४ वर्षाच्या कालावधीत मराठी टंकलेखनाचे ३० शब्द प्रति मिनिट गतीचे अथवा अधिक गतीची **"शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र"** धारण केले असेल, अशा उमेदवारांना एतदर्थ मंडळाची ३० शब्द प्रति मिनिट गतीची मराठी टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येईल.

८) उपरोक्त उमेदवारांना शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१.१०.२००५, अंनियो - १००७/१८/सेवा-४, दिनांक ०७.०७.२००७ आणि

अंनियो -२०१५/ (NPS) / प्र.क्र.३२ / सेवा - ४ दिनांक ०६.०४.२०१५ व त्यानंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार नवीन 'परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना-D.C.P.S.(राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना -NPS)' लागू राहील.

९) माननीय उच्च न्यायालयाने वेळोवेळी जारी केलेल्या निर्देशानुसार उमेदवारांना आंतरजिल्हा बदली अर्ज, या कार्यालयात दोन वर्षाची सेवा पूर्ण झाल्याशिवाय करता येणार नाही.

१०) उमेदवाराची सेवा निवड/प्रतिक्षा यादीनुसार त्यांची सेवा ज्येष्ठता राहील, परंतु उमेदवार विहीत वेळेत सेवेत रुजू न झाल्यास त्याचा त्यांच्या सेवा ज्येष्ठतेवर परिणाम होईल.

११) उपरोक्त उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी दिलेली माहिती आणि जोडलेली शैक्षणिक व इतर प्रमाणपत्र चुकीची आढळल्यास त्यांना त्वरित सेवेतून कमी करण्यात येईल.

१२) उपरोक्त उमेदवाराची सेवा ही महाराष्ट्र नागरी सेवा नियम आणि माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांच्या नियमाधीन असेल.

१३) उपरोक्त उमेदवाराला असे कळविण्यात येते की, त्यांनी **कार्यालयीन अधीक्षक, मुख्य महानगर दंडाधिकारी यांचे कार्यालय, आस्थापना विभाग, तिसरा मजला, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१** येथे वरील नमुद तारखेस सकाळी ठिक १०.३० वाजता न चुकता हजर रहावे किंवा उमेदवारांनी त्यांना हे पत्र मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत हजर न झाल्यास सदर उमेदवाराचे नांव निवड/प्रतिक्षा यादीतून कमी करण्यात येईल, याबाबतची नोंद घ्यावी.

१४) उपरोक्त उमेदवारांस प्रवास भत्ता आणि पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहणार नाही.

Sayalidande
2/1/2021

**(श्रीमती. सायली ते. दंडे)**
प्रभारी मुख्य महानगर दंडाधिकारी,
एस्प्लनेड, मुंबई.

..०४..

<u>प्रत माहितीकरता :</u>

१. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
२. प्रबंधक, मुख्य महानगर दंडाधिकारी यांचे न्यायालय, एस्प्लनेड, मुंबई.
३. उपप्रबंधक/कार्यालयीन अधीक्षक, एस्प्लनेड, मुंबई.
४. मुख्य लिपिक, एस्प्लनेड, मुंबई.
५. गोपनीय विभाग, एस्प्लनेड, मुंबई.
६. वेतन आणि रजा व सेवापुस्तक विभाग, एस्प्लनेड, मुंबई.
७. भविष्य निर्वाह निधी/निवृत्ती वेतन विभाग, एस्प्लनेड, मुंबई.
८. सेवार्थ विभाग, एस्प्लनेड, मुंबई.
९. रोख विभाग, एस्प्लनेड, मुंबई.
१०. संगणक विभाग, एस्प्लनेड, मुंबई.
११. कार्यालयीन आदेश फाईल, एस्प्लनेड, मुंबई.
१२. संबंधित उमेदवार.